दि. ४ जानेवारी २०२६
रविवार
वर्ष ४ थे
अंक ६९
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक
# अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे    उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे
ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

### आजचे पंचाग

- दिनांक : ४ जानेवारी २०२६
- वार : रविवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : पौष
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : शुक्ल पक्ष
- तिथी : पौर्णिमा तिथी (दुपारी ०३:३२ पर्यंत) त्यानंतर प्रथम तिथी
- नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (सायंकाळी ०५:२७ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू न क्षत्र
- योग : ब्रह्म योग (सकाळी ०९:०४ पर्यंत) त्यानंतर इन्द्र योग
- करण : भाव करण (दुपारी ०३:३२ पर्यंत) त्यानंतर बलवा करण
- चंद्र राशी : मिथुन राशी
- सूर्य राशी : धनु राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : सकाळी ०९:५८ ते सकाळी ११:२१ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२१ ते दुपारी ०१:०५
- सूर्योदय : सकाळी ०७:१४
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:१२
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

# महायुती सरकारचा बळीराजाला दिलासा

मुंबई : महायुती सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतच्या पीक कर्ज व्यवहारांवर आकारले जाणारे मुद्रांक शुल्क आता पूर्णतः माफ करण्यात आले आहे. हा निर्णय १ जानेवारी २०२६ पासून राज्यभरात लागू झाला असून, महसूल विभागाने यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केले आहेत. या सवलतीमुळे शेतकऱ्यांच्या कर्ज प्रक्रियेवरील आर्थिक बोजा कमी होणार असून, विशेषतः अल्पभूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होईल.



महाराष्ट्र मुद्रांक कायद्यात (१९५८) केलेल्या दुरुस्तीच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. महसूल आणि वन विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे की, ''शेतकऱ्यांकडून होणाऱ्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जाशी संबंधित कार्यवाही केलेल्या अभिस्वीकृतीवर, रोखपत्र करारनाम्यावर किंवा हक्क विलेख निक्षेपपत्र, तसेच हडपपत्रावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णतः माफ राहील.''

ही १०० टक्के मुद्रांक शुल्क माफीची सवलत केवळ मूलभूत करारांपुरती मर्यादित नसून, तारण किंवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखत, गहाणाचे सूचनापत्र, घोषणापत्र किंवा त्यास संलग्न असलेल्या कोणत्याही कायदेशीर **(पान २ वर)**

# शाहरुख खानच्या या निर्णयामुळे देशभरात वाद; राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या टोकाच्या प्रतिक्रिया

मुंबई : बॉलिवूडचा सुपरस्टार शाहरुख खान सध्या मोठ्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एका निर्णयामुळे देशभरातून त्याच्यावर टीकेची झोड उठवली जात असून, काही संघटनांकडून तीव्र आंदोलन आणि आक्षेपार्ह वक्तव्येही केली जात आहेत. बांगलादेशात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर शाहरुख खानविरोधात संतापाची लाट उसळल्याचं चित्र आहे.

बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या कथित अत्याचारांमुळे देशात आधीच तीव्र भावना आहेत. अशा परिस्थितीत शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघासाठी बांगलादेशी क्रिकेटपटूची निवड केल्याचा आरोप केला जात असून, त्याच निर्णयामुळे हा वाद अधिक चिघळला आहे. काही जणांनी शाहरुख खानवर देशविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप करत त्याला गद्दार ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.

मेरठच्या दौराळा भागात आयोजित अटल स्मृती संमेलनात बोलताना भाजप नेते संगीत सोम यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप केले. आयपीएलमध्ये बांगलादेशी क्रिकेटपटूला कोट्यवधी रुपयांना खरेदी करणं हे देशविरोधी कृत्य असल्याचं त्यांनी म्हटलं. अशा लोकांना देशात राहण्याचा अधिकार नसल्याचा दावाही त्यांनी केला. बॉलिवूड आणि क्रिकेटच्या माध्यमातून देशविरोधी शक्तींना प्रोत्साहन दिलं जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.



दरम्यान, अखिल भारतीय हिंदू महासभेनेही शाहरुख खानच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. शाहरुख खानने आपल्या आयपीएल संघात बांगलादेशी खेळाडूचा समावेश केल्यामुळे लोकांच्या भावना दुखावल्या गेल्याचं संघटनेचं म्हणणं आहे. या निषेधादरम्यान काही ठिकाणी अत्यंत आक्षेपार्ह आणि टोकाच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

आग्रा येथील हिंदू महासभेच्या जिल्हाध्यक्ष मीरा राठोड यांनी केलेलं वक्तव्य विशेष चर्चेत आलं आहे. त्यांनी शाहरुख खानवर गंभीर आरोप करत अत्यंत आक्षेपार्ह विधान केलं, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. या वक्तव्यामुळे राजकीय आणि सामाजिक वर्तुळातही तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

याच प्रकरणात दिनेश फलाहारी महाराज यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून शाहरुख खानवर आरोप केले आहेत. शाहरुख खानला बांगलादेशातील परिस्थितीची माहिती असूनही त्याने बांगलादेशी खेळाडूला मोठ्या रकमेवर विकत घेतल्याचा दावा त्यांनी केला आहे. **(पान २ वर)**

## माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट

मुंबई : महाराष्ट्र राज्याच्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईतील त्यांच्या 'वर्षा' या अधिकृत निवासस्थानी भेट घेतली. रश्मी शुक्ला या पोलीस सेवेतून निवृत्त झाल्या असून, त्या पार्श्वभूमीवर ही सदिच्छा भेट पार पडली.



यशस्वी कारकिर्दीचा गौरव

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रश्मी शुक्ला यांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी पोलीस कारकिर्दीबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन केले. महाराष्ट्राच्या कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात त्यांनी बजावलेल्या महत्त्वाच्या भूमिकेचा मुख्यमंत्र्यांनी यावेळी गौरव केला. प्रशासकीय सेवेतील त्यांचा अनुभव आणि कर्तव्यनिष्ठा राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

शुभेच्छांचा वर्षाव

पोलीस दलातील सर्वोच्च पदावर कार्यरत असलेल्या रश्मी शुक्ला या **(पान २ वर)**

# दिल्लीकरांसाठी महाराष्ट्र सदनात ग्रामीण संस्कृतीची मेजवाणी

नवी दिल्ली : दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीची माहिती देण्यासाठी कस्तुरबा गांधी मार्ग स्थित नवीन महाराष्ट्र सदनात 'हुरडा पार्टी' आणि 'मकर संक्रांत महोत्सवा'चे ९ ते ११ जानेवारी दरम्यान दुपारी १२ ते रात्री ९.३० या वेळेत आयोजन करण्यात आल्याची माहिती निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी दिली.

महाराष्ट्र सदनात डिसेंबर महिन्यात पार पडलेल्या 'महाराष्ट्र खाद्य महोत्सवा'ला दिल्लीकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, आता हिवाळी हंगामाची मेजवानी म्हणून 'हुरडा पार्टी'चे आयोजन करण्यात आले आहे.

शहर आणि गाव यांना जोडणारा हा भावनिक पूल दिल्लीकरांना महाराष्ट्राच्या संस्कृतीच्या अधिक जवळ घेऊन जाणारा ठरणार आहे. या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राच्या आदरातिथ्याचा आणि चवीचा आनंद घेण्याचे आवाहन निवासी आयुक्त आर. विमला आणि गुंतवणूक निवासी आयुक्त सुशील गायकवाड यांनी केले आहे.



संक्रांतीचा गोडवा आणि हुरड्याचा खमंग स्वाद

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या महोत्सवात 'तिळगूळ' आणि पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. सोलापूर, पुणे, नाशिक आणि मराठवाड्यातील शेतांमध्ये ज्याप्रमाणे शेकोटीवर (आकटी) हुरडा भाजून आनंद साजरा केला जातो, तसाच अनुभव येथे दिला जाणार आहे. हुरड्यासोबतच खमंग लसूण चटणी, शेंगदाणा कूट, पिवळाधमक गूळ, साजूक तूप, ताक आणि चुलीवरचे वाफाळलेले पिठलं-भाकरी, भरीत भाकरी, बटाटावडा, भजी सोबतच ऊस, बोरं, ओला हरबरा अशा अस्सल गावरान पदार्थांची रेलचेल येथे असणार आहे. थंडी, शेकोटीची ऊब आणि संगीत मैफिलीत हुरड्याचा आस्वाद, असा दुग्धशर्करा योग **(पान २ वर)**

### नको सुट्ट्या पैशाची कटकट तिकीट काढा झटपट

मुंबई : राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेमध्ये डिजिटल व्यवहारांना प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून फोन पे, गुगल पे व तत्सम यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार, एसटी महामंडळामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने यूपीआय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण होत आहेत.

सप्टेंबर २०२५ महिन्यात एकूण सुमारे ४९.७९ लाखांहून अधिक यूपीआयद्वारे तिकीट व्यवहार झाले असून, त्यातून ६४ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यात ही संख्या आणखी वाढत ७७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तर नोव्हेंबर २०२५ मध्ये यूपीआय व्यवहारांमधून सुमारे ७८.६६ कोटी रुपयांचा महसूल मिळाल्याची नोंद आहे.

डिसेंबर २०२५ मध्येही हीच वाढती प्रवृत्ती कायम राहिली असून,एकूण सुमारे ६२.५९ लाखांहून अधिक युपीआय द्वारे तिकीट व्यवहार झाले असून, त्यातून ८३.६७ कोटी रूपये महसुल जमा झाला आहे.

**(पान २ वर)**

# निवडणुकीच्या प्रचारात 'लाडक्या बहिणी' केंद्रस्थानी

मुंबई : प्रतिनिधी- यंदाची महापालिका निवडणूक मकरसंक्रांतीच्या काळात होत असल्याने प्रचार साहित्यांवर सणाची छाप स्पष्टपणे दिसून येत आहे. मकरसंक्रांतीनिमित्त महिलांकडून वाटल्या जाणा-या 'वाणा'वरही निवडणुकीचा प्रचार रंगताना दिसत आहे. विशेष म्हणजे, प्रचारात महिलांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून 'लाडक्या बहिणीं'साठी खास साहित्य तयार करण्यात आले आहे.

प्रचारासाठी कार्यकर्त्यांना थंडीपासून संरक्षण मिळावे, याचीही काळजी घेण्यात आली आहे. पारंपरिक रुमाल, दुपट्टे आणि टोप्यांसह हुडी, साड्या, टिकल्या, मंगळसूत्र, हळदी-कुंकूचे करंडे अशी विविध प्रचार सामग्री उपलब्ध झाली आहे. एकूणच यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सणासुदीच्या पार्श्वभूमीवर महिलाभिमुख आणि विशेष स्वरूपाचा ठरणार, हे निश्चित आहे.




महानगरपालिका निवडणुकीत ५० टक्के महिला आरक्षण लागू असले, तरी यंदा निवडणूक प्रचार साहित्यावर १०० टक्के महिलांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत आहे. प्रचार साहित्य खरेदीसाठी येणा-या उमेदवारांकडूनही लाडक्या बहिणींना आकर्षित करणा-या साहित्यालाच सर्वाधिक मागणी आहे.

तब्बल ७ ते ८ वर्षांनंतर महानगरपालिका निवडणूक होत असल्याने इच्छुक उमेदवारांची संख्या मोठी आहे. त्यामध्ये महिला उमेदवारांचे प्रमाण लक्षणीय आहे. विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींनी महायुती सरकारला निर्णायक पाठिंबा दिला होता. त्यामुळे 'मिनी विधानसभा' समजल्या जाणा-या या निवडणुकीतही महिला मतदारांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचे प्रचार साहित्य महिलांचा विचार करून खास तयार करण्यात आले असून, लाडक्या बहिणींना केंद्रस्थानी ठेवून प्रचाराची रणनीती आखण्यात आली आहे.

साड्यांचेही विशेष आकर्षण

राज्यात थंडीत प्रचार करणे आव्हानात्मक ठरत असताना, नेत्यांचे फोटो असलेली हुडी आणि साड्या प्रचारात आकर्षण ठरत आहेत. मध्य भारतात थंडीचा जोर मोठ्या प्रमाणात वाढला **(पान २ वर)**

# ऑरेंज गेट ते मरिन ड्राईव्ह बोगद्याचे काम डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

मुंबई : मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासह जलद प्रवासासाठी ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दुहेरी बोगद्याचे काम हाती घेतले आहे. डिसेंबर २०२८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे राज्य सरकारचे उद्दीष्ट असून केंद्र सरकारने या कामासाठी ६८ कोटींचा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उपलब्ध करुन दिला आहे.




सन २०२५-२६ च्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत विशेष सहाय्य (कर्ज) च्या भाग-१ अंतर्गत ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग प्रकल्पासाठी २०० कोटींच्या निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार केंद्र शासनाने ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग प्रकल्पासाठी एकूण २०० कोटींचा निधी मंजूर केला असून मंजूर रकमेपैकी ६८ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

शहरातील पूर्व मुक्तमार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकामासाठी १३५४ कोटी रकमेचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य प्राधिकरणाला उपलब्ध करुन देण्यास राज्य शासनाने **(पान २ वर)**

# लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक: काँग्रेस ॲक्शन मोडवर

## ५ ते ९ जानेवारी दरम्यान उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार

लातूर प्रतिनिधी: स्थानीक स्वराज्य संस्था जिल्हा परीषद पंचायत समिती निवडणूक लवकरच सुरू होत आहे. लातूर जिल्हयातील या आगामी निवडणुकांची जोरदार तयारी सुरू करण्यासाठी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीने युध्दपातळीवर तयारी सुरू केली आहे. जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी पक्षाचे अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करत इच्छुक उमेदवारांच्या अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया आणि उमेदवारी अंतिम करण्याच्या तारखांचा संपूर्ण रोडमॅप जाहीर केला आहे. यानुसार सोमवार दि. ५ जानेवारी २६ पासून काँग्रेस भवन, लातूर येथे अर्ज स्विकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

या स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने संपूर्ण वेळापत्रक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आखले असून, संपूर्ण प्रक्रिया लातूरमधील काँग्रेस भवन येथूनच पार पडणार आहे. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया लातूर जिल्हयातील स्थानीक स्वराज्यसंस्थाच्या निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना आपले अर्ज भरून सोमवार दि. ५ जानेवारी पासून सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत सादर करता येणार आहेत. हे अर्ज काँग्रेस भवन, लातूर येथे शुक्रवार ९ जानेवारी पर्यंत स्वीकारले जाणार आहेत. या निवड प्रक्रीयेतील अर्ज काँगेस भवन येथे आशिष पाटील - जळकोट, बाबासाहेब गायकवाड ओसा, चंद्रशेखर दंडीमे लातूर, सहदेव मस्के - लातूर, दगडूसाहेब पडीले- लातूर, प्रभाकर बंडगर (शिरूर अनंतपाळ-निलंगा, प्रा. डॉ. बालाजी वाघमारे (लातूर), निळकंठ भोसले, धनराज टेकाळे, बाळकृष्ण माने (रेणापूर) यांच्याकडे अर्ज स्वीकारण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाकडील उमेदवारीसाठीचे इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १० नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा निवड समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून, **(पान २ वर)**

### छत्तीसगडमध्ये १२ माओवाद्यांना कंठस्नान

सुकमा : प्रतिनिधी- छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यातील कोटा कीष्टराम जंगलात दोन्ही बाजूने गोळीबार सुरू आहे.

३ जानेवारी पहाटेपासूनच ऑपरेशन सुरू झाले होते.डीआरजी व सीआरपीएफ पोलिसांच्या ऑपरेशन दरम्यान पोलिसांनी जंगलात प्रवेश केल्यानंतर माओवादी संघटनेने हल्ला केला. त्याला प्रत्युत्तर देत जवळपास दीड तास चकमक चालली. माओवाद्यांचे १२ शवासह एके-४७ अत्याधुनिक रायफल पोलिसांनी जप्त केली आहे. कोटा येथील पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी ही माहिती दिली. या वर्षी मार्च महिन्यापर्यंत देश नक्षलमुक्त करण्याचा विडा केंद्र सरकारने उचलला आहे. गेल्या तीन महिन्यांपासून सुरक्षा यंत्रणा आणि माओवाद्यांमध्ये मोठी चकमक उडालेली आहे.

# मतदान हा लोकशाहीचा पाया; महिलांनी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी पुढाकार घ्यावा

लातूर (प्रतिनिधी): आगामी लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी निवडणूक विभागाच्या 'स्वीप' कक्षाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून लातूर शहरातील महिला बचत गटांचा भव्य मेळावा उत्साहात पार पडला. महिलांच्या सक्रिय सहभागातून मतदानाची टक्केवारी वाढवणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.




मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शन

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील विधी समुपदेशक ॲड.अनिता पुंडलिकराव मेखले,मनपा उपायुक्त श्रीम.वसुधा फड आणि शहर अभियंता श्रीम. उषा शिंदे-काकडे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक आणि राजकीय सहभागावर भर दिला. कुटुंबाची धुरा सांभाळणाऱ्या महिलांनी मतदानाच्या दिवशी घराबाहेर पडून आपला हक्क बजावणे गरजेचे आहे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आयोजन आणि संकल्प पत्र वितरण

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन लातूर महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी तथा 'स्वीप' कक्षाच्या नोडल अधिकारी मा. श्रीम. श्वेता नागणे यांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित महिलांना आगामी निवडणुकीत शंभर टक्के मतदान करण्याची 'मतदार शपथ' देण्यात आली. तसेच 'मी मतदान करणारच' अशा आशयाच्या संकल्प पत्रांचे वितरणही यावेळी करण्यात आले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान

या मेळाव्यासाठी 'दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना'तंर्गत स्थापन झालेल्या बचत गटांच्या महिलांनी मोठी गर्दी केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच समूह संसाधन व्यक्ती श्रीम. मुळे, श्रीम. भालेराव, श्रीम. भालेकर, श्रीम. सोनकांबळे, श्रीम. गोरे, श्रीम. सातपुते, **(पान २ वर)**

# नव्या वर्षात दडलंय काय?

२०२५ हे वर्ष अनेक राजकीय आरोप-प्रत्यारोपांमुळे गाजलं. २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुदुचेरी या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या निकालांमुळे केवळ नवी राजकीय समीकरणेच उदयाला येणार नाहीत, तर राजकीय दशा आणि दिशाही बदलेल, असा दावा केला जात आहे.

२०२६ हे आशावादी आहे. अनेक जुन्या प्रश्नांची उत्तरे देणार. काही महत्त्वाच्या घडामोडींना चिन्हांकित करणार. देशातील राजकारण आणि प्रशासनाला आकार देऊ शकतात. नवे वर्ष हे सत्ताधारी भाजप आणि प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेससह अनेक पक्षांसाठी महत्त्वाचे ठरणार. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने पुन्हा एकदा पकड बसवली. झारखंड वगळता दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र आणि बिहारसह अनेक राज्यांतील विधानसभा निवडणुकीत भाजपने विजय मिळवला. त्यामुळे भाजपची वाटचाल अगदी जोमात सुरू आहे. लोकांना मोदी जे बोलतात ते पटले आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये भाजपने चांगली कामगिरी केली असली तरीही तेथे भाजपची कामगिरी नाही. तेथे नॅशनल कॉन्फरन्सच्या कुबड्या पक्षाला हाती घ्याव्या लागल्या आहेत. पण जम्मूमध्ये पक्षाची कामगिरी चांगली आहे. असे असले तरीही १५ जानेवारी रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुका या भाजपसाठी खऱ्या अर्थाने परीक्षाच आहेत. यात भाजपचा खरा कस लागणार आहे. कारण आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्र आले आहेत. जरी राज यांनी मुंबई महापालिकांपुरती ही युती असल्याचे जाहीर केले असले तरीही भाजपला यापासून सावध राहावे लागेल. मुंबई महापालिका ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी नव्हे तर आर्थिकदृष्ट्या सर्वात शक्तिशाली पालिका आहे. त्यामुळे तेथे जो कुणी विजय मिळवेल तेथे त्याचा राज्यभर डंका चालेल. म्हणून तर उद्धव ठाकरे यांचा मुंबईसाठी आटापिटा चालू आहे. एकट्या मुंबई पालिकेचे बजेट आहे ३१ हजार कोटी रुपयांचे. यावरून मुंबई पालिकेच्या विशाल आकाराचा अंदाज यावा.

भारतातील सर्वात श्रीमंत पालिकेचे नियंत्रण केवळ प्रशासकीय शक्तीच नव्हे तर त्याचे प्रतीकात्मक मूल्य प्रचंड आहे. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर देशात होतील त्या प. बंगाल, आसाम, पुदुचेरी आणि केरळ तसेच तामिळनाडू या राज्यांच्या विधानसभा निवडणुका. येथे भाजप फारसा ताकदवान नाही पण तेथे तो चमत्कार घडवू शकतो. यात प. बंगालची निवडणूक भाजपसाठी महत्त्वाची आहे आणि तितकीच अवघड आहे. कारण येथे भाजपला बंगालमधील राजकीय ध्रुवीकरणाचा लाभ होत नाही. प. बंगालमध्ये सर्वात लक्षवेधी लढती होणार आहे. तामिळनाडूचे राजकीय परिदृष्य पारंपरिकपणे द्विपक्षीय राहिले आहे. तेथे द्रमुक आणि अण्णा द्रमुक याच दोन पक्षांची सरकारे आलटून पालटून राहिली. जो कुणी सत्तेवर असतो तो विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याचा प्रयत्न करतो. हेच तेथे सातत्याने चालत आले आहे. सत्ताधारी द्रमुकची या भागावर चांगलीच पकड आहे आणि आता तर विभाजित अण्णा द्रमुकमुळे तेथे द्रमुकची पकड आणखी मजबूत झाली आहे. भाजपचा यात फासा कुठेही बोलबाला नाही. केवळ तुलनेने दुर्बल पक्षाला तो हात देऊ शकतो. पण यापेक्षा काही नाही. आसामात मात्र तुलनेने निवडणूक सोपी आहे. कारण तेथील ध्रुवीकरणाचे नेतृत्व भाजपच्या लाभासाठी काम करत आहे. त्यामुळे तेथे विजय सोपा आहे. शिवाय तेथे भाजपने मदरशाना अनुदान बंद केले असून तेथे हिंदूंची शक्ती उभी केली आहे, तिचा भाजपला लाभ होईल. सर्वात महत्त्वाच्या आणि भाजपसाठी अत्यंत अवघड निवडणुका असतील त्या केरळच्या.

केरळमध्ये भाजपला कधीही यश मिळाले नाही. तेथील डावी लोकशाही आघाडी आणि काँग्रेस यांनी भाजपला चंचुप्रवेश करू दिला नाही. पण एक भाजपसाठी आशादायक चिन्ह आहे. कारण केरळातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या त्यात डाव्या लोकशाही आघाडीला धक्का बसला. येत्या निवडणुकात भाजपचा बेत येथे दोन अंकी जागा मिळवण्याचा आहे आणि असे झाले तर भाजपचा तो खूप मोठा विजय ठरेल. या निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीचा पराभव झाल्यास प्रथमच कम्युनिस्टांचा मुख्यमंत्री राहणार नाही. केरळच्या राजकारणात भाजप आपला ठसा उमटवू पाहत आहे. काँग्रेस आणि डावे पक्ष हे प्रमुख घटक पक्ष असल्याने इंडिया गटातील अंतर्गत समीकरणे यामुळे बदलतील असे चित्र दिसू शकते. पण हे झाले राजकीय चित्राचे गणित. पण २०२६ च्या निवडणुकाआधी भाजपचे नेते अमित शहा यांनी भाजप नेत्यांना तळागाळातील नेत्यांना आवाहन करून त्यांना आणखी मजबूत करण्याचे आवाहन केले. आसाममध्ये सत्ता मिळवणे भाजपला अवघड जाऊ नये. गौरव गोगोई यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसकडून जबरदस्त लढत मिळाली तर भाजपला ही लढत वाटते तितकी सोपी जाणार नाही हे नक्की. काँग्रेससाठीही येणारे वर्ष कमी आव्हानात्मक असणार नाही. कारण आसाममध्ये परतीकडे आस लावून बसलेली काँग्रेस बंगालमध्ये जवळपास संपल्यात जमा आहे. काँग्रेसच्या साऱ्या आशा केरळवर एकवटल्या होत्या, पण तेथेही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपने बाजी मारून काँग्रेसला पुन्हा एकदा निराशेचे पाणी पाजले. अर्थात काँग्रेसचे स्थानिक नेतृत्वातील वाद आणि संघर्ष यास काही प्रमाणात कारण आहेच. बंगालमध्ये तृणमूल भाजपला सहज विजयाप्रत नेईल असे चित्र आहे. पण याची कल्पना निकाल लागल्यावरच येईल. या राज्यातील निवडणुकांचा निकाल लागल्यावरच हे वर्ष कसे जाईल हे सांगता येईल. अण्णा द्रमुकमध्ये आपसातील संघर्षामुळे स्टॅलिनय यांचे काम सोपे झाले. तसेच बहुतक ठिकाणी आहे. पण भाजपला येथे फारसा वाव नाही. नवीन वर्षाचे आगमन अपेक्षांसह होते. पण यंदा या राज्यांतील विधानसभा निवडणुका ठरवणार आहेत आणि एकूणच राजकीय वाटचाल कशी राहील आणि लोकांचे कल्याण हे कसे साध्य केले जाईल. पण सध्या तरी सारेच चित्र अदृष्य आहे आणि नीट काहीच दिसत नाही. सर्वात आधी मुंबई महापालिका निवडणुकांचे निकाल आहेत त्यात जर ठाकरे बंधू अपयशी ठरले तर त्यांची राजकीय वाटचाल अवघड होईल आणि त्यांना दुसरा कसला पर्याय उरणार नाही.



# ग्रामीण भागातील नागरिकांना सर्व सोई सुविधा पुरविणार : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

## आपला लोकसेवक म्हणून जबाबदारीने काम करत आहे

**मनेश पाटील**

उदगीर : शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी मी गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे आपला लोकप्रतिनिधी असलो तरी लोकसेवक म्हणूनच आज पर्यंत मी काम केले आहे. त्यामुळेच मंत्रिपदाच्या काळात मतदारसंघात विकासाचा डोंगर उभा करून शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना सर्व सोई सुविधा पुरविल्या असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर तालुक्यातील नागलगाव ग्रामपंचायतीच्या नुतन इमारतीचा भुमीपुजन सोहळ्या प्रसंगी बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, नागलगावचे सरपंच सुभाष राठोड, उपसरपंच नेताजी कांबळे, प्रा.श्याम डावळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, नगरसेवक व्यंकट बोईनवाड, माजी सरपंच राजीव वाघे, अंकुश वाघे, सुर्यकांत चवळे, चेअरमन कलप्पा पाटील, बाळु गुरमे, ईब्राहिम देवर्जनकर, संग्राम मोरखंडे, ॲड. तात्या पाटील, गुणवंतराव पाटील, रामलिंग स्वामी, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, मतदार संघातील प्रत्येक गावावर माझ लक्ष असल्याने ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी यासह विविध सभागृह यासाठी निधी उपलब्ध करून देवुन ग्रामीण भागाचा विकास केला आहे. नागलगाव येथील ग्रामपंचायतच्या इमारत बांधकामासाठी सुमारे २५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून नविन इमारत बांधकाम होत आहे. भविष्यात सर्वसामान्याला या ग्रामपंचायतीमार्फत सर्व कागदपत्रे व सुविधा पुरविल्या जातील यासाठी निधी अपुरा पडल्यास आणखीन वाढीव निधी देणार असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

उदगीर ते देगलूर हा तब्बल ८१० कोटी रुपयाचा रस्ता मंजूर केला केला आहे. त्याही कामाला लवकरच सुरुवात होऊन आपल्या भागाचा विकास होणार आहे. मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी या भागात एम.आय. डी. सी उभारणार आहे. मागील काळात सर्व जाती धर्मांना सर्वांना सोबत घेवुन मतदार संघाचा विकास केला असुन मी मंत्री व आमदार असलो तरी केवळ आपला लोकसेवक म्हणून जबाबदारीने काम करत असल्याची ग्वाही आमदार संजय बनसोडे यांनी दिली. यावेळी नागलगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शास्त्री विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती संपन्न



मनेश पाटील

उदगीर - उदगीर:येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृष्णा मारावार, प्रमुख पाहुणे शैलेश बुरगे, लक्ष्मी चव्हाण तसेच प्रमुख उपस्थितीत सुनंदा टोम्पे, रेणुका कानगुले, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक किरण नेमट, माधव मठवाले, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख निलेश मांडवकर उपस्थित होते.

यावेळी कर्तुत्ववान सावित्रीच्या लेकी म्हणून सुनंदा टोम्पे व रेणुका कानगुले यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रमूख वक्ते शैलेश बुरगे यांनी आपल्या मनोगतात सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या कैवार घेतल्यामुळे मुलींना शिकता आलं.याकरीता समाजातील मुलींनी शिकावे यासाठी त्या स्वतः आधी शिकल्या व नंतर समाजाकडून होणारा त्रास सहन करून मुलींना शिकविले असल्याचे सांगितले. तर प्रमुख पाहुण्या लक्ष्मी चव्हाण यांनी सावित्री होत्या म्हणून मुली शिकल्या. चुल आणि मुल यांच्या बाहेर पडून स्त्रिया सर्व क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत अशा पद्धतीची माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात मारावार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षिता पांडे, प्रास्ताविक वैदही कासले, स्वागत परिचय श्रीनिवास कानवटे,आभार नैतिक चामले यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् नी झाली.

# धाराशिवमध्ये शाळकरी पोरांमध्ये गँगवॉर ; क्षुल्लक कारणावरून शालेय विद्यार्थ्यांमध्ये तूफान हाणामारी

धाराशिव: धाराशिव जिल्ह्यातील कळंब शहरात क्षुल्लक कारणावरून शालेय विद्यार्थ्यांमध्ये तूफान हाणामारी . विद्यार्थ्यी चक्क एकामेकांना लोखंडी सळ्या , फायटर आणि लाठ्या-काठ्यानी मारत होते . या थरारक हाणामारीचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे. विद्यार्थी चक्क गुंडगिरीकडे वळत असल्याचे धक्कादायक चित्र व्हिडिओद्वारे समोर आलं आहे.

नेमका प्रकार काय?

मिळालेल्या माहितीनुसार, कळंब शहरातील एका नामांकित शाळेच्या परिसरात हा प्रकार घडला. किरकोळ कारणावरून विद्यार्थ्यांच्या दोन गटात वाद झाला आणि त्याचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले. दोन्ही गटातून जवळपास ३० विद्यार्थी हाणामारीत सहभागी होते. हे विद्यार्थी केवळ हातापायाने हाणामारी करत नव्हते, तर त्यांच्या हातात चक्क लोखंडी सळ्या, फायटर आणि लाठ्या-काठ्या होत्या. एखाद्या सराईत गँगस्टरप्रमाणे हे विद्यार्थी एकमेकांवर तुटून पडत होते. सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कळंब शहरात खळबळ उडाली आहे. ज्या शाळेच्या परिसरात ही घटना घडली, त्या शाळेच्या शिक्षकांचे आणि प्रशासनाचे या विद्यार्थ्यांकडे लक्ष नाही का? असा संतप्त प्रश्न पालकवर्ग विचारत आहेत. शाळेच्या आवारात किंवा शाळेच्या बाहेर जर अशा प्रकारे जीवघेणी शस्त्रास्त्रे घेऊन विद्यार्थी फिरत असतील, तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे काय? हा गंभीर प्रश्न आता उपस्थित झाला आहे. महत्वाचे म्हणजे दोन्ही गट आपसात भिडले असले तरी कुणालाही गंभीर दुखापत झाली नाही. सुदैवाने ही हाणामारी सुरू असताना काही विद्यार्थ्यांनी मध्यस्थीची भूमिका घेतली, यानंतर हे भांडण शांत झालं. या प्रकरणी अद्याप कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली नाही. पण शाळेतील विद्यार्थ्यांनी अशाप्रकारे हाणामारी केल्याने ही घटना चर्चेचा विषय ठरत आहे.

पान १ वरून

## महायुती सरकारचा...

व्यवहारालाही लागू राहणार आहे. यापूर्वी शेतीच्या पीक कर्जावर प्रत्येक एक लाख रुपयांमागे ०.३ टक्के मुद्रांक शुल्क आकारले जात होते. त्यानुसार दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी शेतकऱ्यांना सुमारे ६०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. आता हे शुल्क पूर्णतः माफ झाल्याने प्रत्येक कर्ज प्रकरणामागे शेतकऱ्यांची थेट ६०० रुपयांची बचत होणार आहे.

नेमका निर्णय काय झाला?

महसूल विभागाने दोन वर्षांपूर्वीच दीड लाख रुपयांपर्यंत मुद्रांक शुल्क माफी देण्याची शिफारस केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १६ मार्च २०२४ रोजी बीड येथील शेतकरी मेळाव्यात याची घोषणा केली होती. त्यानंतर गेल्या दीड वर्षांत दीड लाखांपर्यंतची सवलत लागू होती. मात्र, दीड लाखांपर्यंतचे व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या तुलनेने कमी असल्याने या योजनेचा फारसा फायदा शेतकऱ्यांना मिळत नव्हता. आता मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांना या सवलतीचा लाभ मिळेल. हा निर्णय राज्यभरातील सर्व बँका, सहकारी संस्था आणि कर्जवाटप करणाऱ्या यंत्रणांना बंधनकारक राहणार आहे. पीक कर्ज घेताना लागणाऱ्या विविध कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्काचा बोजा कमी झाल्याने कर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. शेती उत्पादन खर्च, बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचे सतत वाढते दर लक्षात घेता हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक आहे.

## शाहरुख खानच्या...

तसेच, शाहरुख खानचे बांगलादेशातील काही कट्टर घटकांशी संबंध असू शकतात, असा आरोपही या पत्रात करण्यात आला आहे. या आरोपांमुळे संपूर्ण प्रकरण अधिक गंभीर होत चाललं आहे.

दरम्यान, या सर्व घडामोडींवर शाहरुख खान किंवा त्याच्या व्यवस्थापनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र या वादामुळे सोशल मीडियावर तीव्र चर्चा सुरू असून, समर्थन आणि विरोध अशा दोन्ही बाजूंनी प्रतिक्रिया येत आहेत.

## माजी पोलीस...

निवृत्त होत असल्याने पोलीस दलातही भावना व्यक्त केल्या जात आहेत. मुख्यमंत्र्यांनी त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस आणि सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी उत्तम आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. या सदिच्छा भेटीवेळी उभयतांमध्ये प्रशासकीय विषयांवरही चर्चा झाल्याचे समजते.

## दिल्लीकरांसाठी...

या निमित्ताने जुळून येणार आहे. याबरोबरच संक्रात वाणासाठी महिलांनी बनविलेल्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

## निवडणुकीच्या प्रचारात...

असून, कडाक्याच्या थंडीत कार्यकर्ते घराबाहेर पडण्यास कचरतात, त्यामुळे उमेदवारांच्या प्रचारावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. ही अडचण लक्षात घेऊन उमेदवारांनी आणि पक्षनेत्यांनी कार्यकर्त्यांसाठी विशेष प्रकारच्या हुडी तयार केल्या आहेत. या हुडी घालून कार्यकर्ते थंडीपासून संरक्षण करत प्रचारात जोमाने सहभागी होत आहेत. विशेष म्हणजे, यंदा केवळ पुरुष कार्यकर्त्यांचाच नव्हे, तर महिला कार्यकर्त्यांचाही विचार करण्यात आला आहे.

## ऑरेंज गेट....

मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाच्या मंजूर वित्तीय आराखड्यानुसार प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के रक्कम ३०७.२२ कोटी, राज्य स्तरीय करांसाठी ६१४.४४ कोटी आणि खाजगी व शासकीय जमीन कायमस्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपातील जागा उपलब्ध करुन देण्याबाबतचा खर्चाची तरतूद ४३३ कोटी असे एकूण १३५४.६६ कोटी बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य राज्य शासनाकडून प्राधिकरणाला उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

मुंबई शहरातील पूर्व मुक्तमार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यान वाहतुकीच्या दळणवळणासाठी भुयारी मार्गाचे बांधकाम प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ६८ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.

## नको सुट्ट्या...

एसटी महामंडळाने बसस्थानकांवर, तिकीट खिडक्यांवर तसेच प्रवासादरम्यान कंडक्टरकडून यूपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचत असून रोख रकमेचा व सुट्ट्या पैसे ठेवण्याचा त्रास कमी झाला आहे. अर्थात, त्यामुळे सुट्ट्या पैशावरुन वाहकांशी होणाऱ्या अनावश्यक वाद-विवादाला पूर्ण विराम मिळाला आहे.

याबरोबरच काही वाहकांकडून होणारा पैशाचा अपहार रोखण्यासाठी देखील डिजिटल पेमेंट प्रक्रियेची मदत झाली आहे. त्यामुळे यूपीआय व्यवहारांमुळे पारदर्शकता वाढली असून महसूल गळतीला आळा बसण्यास मदत होत आहे. येत्या काळात डिजिटल पेमेंटचा वापर आणखी वाढेल, असा विश्वास एसटी प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## लातूर जिल्हा...

उमेदवारांच्या नावांची शिफारस तातडीने प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हा समितीने शिफारस केलेल्या नावांवर प्रदेश निवड समिती निर्णय घेणार आहे. प्रदेश निवड समिती या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब करून उमेदवारांची यादी जाहीर करण्याची शक्यता आहे.

जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी सर्व इच्छुकांनी वेळेचे बंधन पाळून आणि पक्षाच्या शिस्तीनुसार अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अभय साळुंके यांच्या या स्पष्ट वेळापत्रकामुळे लातूर काँग्रेसने निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

## मतदान हा...

श्रीम. पवार श्रीम. जाधव आणि शहर अभियान व्यवस्थापक श्री. लक्ष्मण जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. या मेळाव्यामुळे लातूर शहरातील महिला बचत गटांमध्ये मतदानाबाबत मोठी जनजागृती झाली असून, आगामी निवडणुकीत महिलांचा सहभाग लक्षणीय ठरण्याची चिन्हे आहेत.

# श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सव समिती तर्फे उदगीर शहरातील पत्रकारांचा सत्कार



**मनेश पाटील**

उदगीर/ प्रतिनिधी - श्री गुरु हावगीस्वामी यात्रा महोत्सव व नुतन वर्षानिमित्य ष.ब्र.प.श्री. श्री.१०८ डॉ शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी रामभाऊ मोतीपवळे, अंबादास अलमखाने, महेशकुमार मठपती, रविंद्र हसरगुंडे, नागनाथ गुट्टे, सुनिल हवा, संग्राम पवार, संदिप निडवदे, अशोक तोंडारे, संगम पटवारी, विक्रम हलकीकर,मनोहर लोहारे,श्रीधर शेवाळे, अरविंद पत्की ,बालाजी कसबे,अरुण उजेडकर,मंगेश सुर्यवंशी यांच्यासह असंख्य पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.यावेळी ष.ब्र.प.श्री.श्री १०८ डाॅ.शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी पत्रकारा बद्दल गौरव उद्गगार काढून पत्रकारांच्या लेखनीचे कौतुक केले.याप्रसंगी सुत्रसंचलन व आभार विरभद्र स्वामी सताळकर यांनी केले.यावेळी अनेक मान्यवर सह असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

# श्री शंभुलिंग शिवाचार्य विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांना जयंती निमित्त अभिवादन




लातूर : येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थांतर्गत व गिरवलकर नगर येथील श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालयात शनिवार, दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. हे पूजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पुष्पा पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. पूजनानंतर शाळेत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका पाटील पी. जी. उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांकडून बालविवाह निर्मूलन शपथ घेण्यात आली. तसेच वेशभूषा स्पर्धा, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषण स्पर्धा, 'मी सावित्री बोलते' हे एकपात्री नाट्य अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या विचारांचा जागर केला. अध्यक्षीय समारोप प्रसंगी मुख्याध्यापिका पाटील पी. जी. यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची 'लुगड्याची गोष्ट (साडीची कहाणी)' तसेच त्यांच्या जीवनावर आधारित स्वतः तयार केलेला काव्यसंग्रह विद्यार्थ्यांसमोर काव्याच्या माध्यमातून प्रभावीपणे सादर केला. त्यांच्या या सादरीकरणाने उपस्थितांना भावनिक व प्रेरणादायी अनुभव दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख व परीक्षा विभाग प्रमुख आरदवाड एस. बी. यांनी केले, तर आभार क्रीडा शिक्षक श्री. घुगे ए. पी. यांनी मानले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्त्री शिक्षण, सामाजिक समानता व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची जाणीव निर्माण झाल्याचे दिसून आले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# वर्षभरात तब्बल १८०६ गुन्हे

## पाचशे ढाब्यांवर कारवाई, सव्वातीन कोटींचा माल जप्त

धाराशिव - अवैध दारू विक्री, साठवणूक आणि बेकायदेशीर वाहतुकीविरोधात धाराशिव जिल्ह्यात मागील वर्षभरात तब्बल १८०६ गुन्हे उघडकीस आले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने २०२५ या संपूर्ण वर्षभरात मोठी कारवाई केली आहे. कारवाईत सातत्य राखत अवैध मद्य विक्री, वाहतूक आणि साठवणूकीस आळा घातला गेला आहे. यापुढेही जिल्ह्यात अवैध मद्य विरोधी कारवाई अशीच सुरू राहणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे यांनी दिली.

मागील वर्षभरात धाराशिव राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेषतः हॉटेल आणि धाब्यांवर लक्ष केंद्रित केले. हॉटेल आणि धाब्यावर करण्यात आलेल्या कारवायांमध्ये एकूण ५०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये सर्वच प्रकरणे वारस स्वरूपाची असून ६३० आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या कारवायांदरम्यान दोन वाहने जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत सुमारे ८ लाख रुपये आहे. हॉटेल व धाब्यांवरील कारवायांमध्ये एकूण २९ लाख ९३ हजार ५७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हाभरात करण्यात आलेल्या एकूण कारवायांची संख्याही यापेक्षा मोठी आहे.

२०२५ या वर्षात धाराशिव जिल्ह्यात एकूण १०८६ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये १७२४ वारस आणि ८२ बेवारस प्रकरणांचा समावेश आहे. या सर्व कारवायांमध्ये १८७७ आरोपींना अटक करण्यात आली असून, ६५ वाहने जप्त करण्यात आली आहेत. जप्त वाहनांची किंमत तब्बल ८९ लाख २४ हजार रुपये इतकी आहे. तर वर्षभरात एकूण ३ कोटी ९ लाख ८० हजार पाच रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# मेडिकल कॉलेजमध्ये पहिले गुडघा प्रत्यारोपण



धाराशिव - येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पहिली गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. विशेष म्हणजे शासकीय रुग्णालयात जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या मातोश्रीवर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गुडघ्या प्रत्यारोपणाचा हा पहिलाच प्रयोग यशस्वी झाल्याबद्दल वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकमेकांचे अभिनंदन केले आहे.

पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या मातोश्री सुनीता देवी (वय ५८) यांना दोन्ही गुडघ्यांमध्ये त्रास होता. मोठ्या वेदना जाणवत होत्या. गुडघ्याची झीज झाली होती. त्यामुळे त्यांचे दोन्ही गुडघे बदलावे लागतील, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला होता. त्यानुसार सुनीता देव कोणत्याही खाजगी रुग्णालयात दाखल न होता धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी दाखल झाल्या. वेदनारहित हालचालीसाठी वैद्यकीय महाविद्यालयात होत असलेली ही पहिलीच गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होती. अत्यंत गुंतागुंतीची ही शस्त्रक्रिया महाविद्यालयातील तज्ज्ञ वैद्यकीय मंडळींनी यशस्वी पार पाडली असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शैलेंद्रसिंह चौहान यांनी दिली आहे.

शासकीय रुग्णालयात ही गुडघ्याची शस्त्रक्रिया होऊ शकते अशी खात्री केल्यानंतर अधिष्ठाता चौहान यांनी अस्थिरोग विभागप्रमुख डॉ. बालाजी भराटे यांच्याशी चर्चा करून ही शस्त्रक्रिया आपल्या रुग्णालयात करू या म्हणून शस्त्रक्रियेसाठी लागणारी सर्व तयारी करून दिली. शुक्रवार २ जानेवारी रोजी प्रथमच टोटल 'नी रिप्लेसमेंट' ही शस्त्रक्रिया यशस्वी रित्या पार पडली. यासाठी मिरजचे प्रसिध्द अस्थिरोग तथा सांधा प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. भास्कर प्राणी व डॉ. बालाजी भराटे यांनी परिश्रम घेतले. त्यासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ तानाजी लाकाळ, भूलशास्त्र विभागप्रमुख डॉ. पुष्पा अग्रवाल, डॉ. सोनटक्के, डॉ. गणेश खंदारकर, डॉ. दिप्ती नगराळे, डॉ. सुयश इंगळे, डॉ. ओंकार केरकर, डॉ. हर्षद पवार, डॉ. गायकवाड, निंबाळकर सिस्टर, जाधव आदींनी सहकार्य केले. विशेष म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अशी शस्त्रक्रिया व पोलीस अधीक्षक यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयावर दाखवलेला विश्वास महाविद्यालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढवणारा आहे. या शस्त्रक्रियेसाठी महाविद्यालय व रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी मेहनत घेतली. याबद्दल कौतुक होत आहे.



# शिवनेरी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दै. अदिती एक्सप्रेस**

शिरूर अनंतपाळ : येथील शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रशांत पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. स्त्री शिक्षणाचा पाया घालून समाजातील महिलांच्या जडणघडणीत सावित्रीबाई फुले यांचा मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्येक स्त्रीने सावित्रीबाईंचे विचार समाजासमोर मांडावेत व त्यांच्या कार्याची व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. शेख शौकत आली यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# सातव्या अनाथ बाळाचे दत्तक विधान

## अंकुर शिशुगृहात भावनिक वातावरणात सोहळा

**धाराशिव-** धाराशिव येथील अंकुर शिशुगृहात सातव्या अनाथ बाळाच्या दत्तक विधानाचा भावनिक सोहळा मोठ्या उत्साहात आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला. एका लहानशा अनाथ चिमुकल्या बाळाच्या आयुष्यात मायेचे आई-बाबा आले. निराधारतेची वेदना मागे टाकत प्रेम, विश्वास आणि सुरक्षिततेचे नवे विश्व या बाळासाठी खुले - झाले. दत्तक विधानाच्या क्षणी उपस्थितांचे मन भरून आले होते.

येथील कुलस्वामिनी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व प्राचार्य डॉ. रमेश दापके, नवनिर्वाचित नगरसेवक खलिफा कुरेशी, अभिजीत काकडे, प्रशांत पाटील, यशश्री क्लासेसचे संचालक रवी निंबाळकर, समाजसेविका आशा कांबळे, ॲड. अश्विनी सोनटक्के तसेच सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांनी उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवली आणि सामाजिक बांधिलकी जपली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून अंकुर शिशुगृहाच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. अनाथ व निराधार बालकांना केवळ निवारा देणे नव्हे, तर मायेची ऊब, सुसंस्कार आणि उज्ज्वल भवितव्य देण्याचे हे कार्य समाजासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले. दत्तक प्रक्रियेद्वारे अशा बालकांच्या आयुष्यात स्थैर्य आणि आनंद निर्माण होतो, यावरही मान्यवरांनी भर दिला. महिला व बाल विकास विभाग, बाल कल्याण समितीच्या मार्गदर्शनाखाली अंकुर शिशुगृह ही सेवा प्रेम, निष्ठा आणि माणुसकीच्या भावनेतून अखंडपणे बजावत आहे. संस्थेचे मार्गदर्शक डॉ. दिग्गज दापके-देशमुख यांच्या प्रेरणेतून आजपर्यंत अनेक निराधार बालकांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. सातव्या बाळाच्या दत्तक विधानामुळे या सेवाकार्याला आणखी एक मानाचा शिरपेच लाभला आहे.

# अंगणवाडीतील चिमुकल्यांनी केले सावित्रीमाईंना वंदन

नांदेड- क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषद शाळेत, अंगणवाडी आणि ग्रामपंचायत कार्यालयातही अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला जि. प. शाळेत विद्यार्थिनींनी, अंगणवाडीत चिमुकल्यांनी तर ग्रामपंचायत कार्यालयात मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्राथमिक पदवीधर शिक्षिका संगिता बडवणे, सहशिक्षक संतोष घटकार, अंगणवाडी कार्यकर्ती इंदिरा पांचाळ, मारोती चक्रधर, मनिषा गच्चे, आनंद गोडबोले, हरिदास पांचाळ, पांडुरंग गच्चे आदींची उपस्थिती होती.

भारतातील आद्यशिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ३ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा लेक शिकवा अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लोहा तालुक्यातील जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

# जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पूनम चेडे प्रथम



**वाशी,** - हाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेचा निकाल जाहीर झाला आहे. यात वाशी येथील तंत्र प्रशालेच्या पूनम गौतम चेडे गौतम यांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शिक्षकांमध्ये संशोधक वृत्ती वाढीस लागावी आणि अध्ययन - अध्यापन प्रक्रियेत नाविन्यपूर्ण प्रयोगांचा वापर व्हावा या उद्देशाने दरवर्षी या स्पर्धांचे आयोजन केले जाते. धाराशिव जिल्हास्तरावर सादर करण्यात आलेल्या विविध उपक्रमांमधून पूनम चेडे यांच्या नवोपक्रमाची गुणवत्ता आणि उपयुक्तता सर्वोत्तम ठरली. जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केल्यामुळे त्यांची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. येत्या जानेवारी २०२६ मध्ये एनसीईआरटी. पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत त्या धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल जे. आय. आर. टी. तंत्र प्रशाला वाशीचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी चेडे यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच पुणे येथे होणाऱ्या आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतील यशस्वी वाटचालीस त्यांना प्रशालेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# भारतातील आद्य शिक्षिका : सावित्रीबाई फुले:प्रा.पाटील

**दै. अदिती एक्सप्रेस**
**मनेश पाटील**



उदगीर प्रतिनिधी- एकोणीसाव्या शतकात ब्रिटीश काळात ब्राह्मणशाहीने जात,धर्म या नावाखाली बहुजन समाजाला गुलाम केले होते. शिक्षणापासून इतरांना वंचित ठेवले होते. अशा काळात सावित्रीबाई फुले या भारताच्या आद्य शिक्षिका बनल्या असे उद्गार

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात एकोणीसाव्या शत्कातील भारतीय शिक्षणाच्या आद्य जनक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आयोजित केली होती त्याप्रसंगी सौ.मनीषा पाटील यांनी काढले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एम.मांजरे होते.तर विचार मंचावर श्री दिलीप पाटील, प्रबंधक बी. के.पाटील,अधिक्षक व्ही. डी. गुरनाळे उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुढे बोलताना सौ.पाटील म्हणाल्या सावित्रीबाईंनी अशा काळात मुलींच्या शिक्षणासाठी द्वारे खुली केले. अंगावर शेण-चिखल, दगड-गोटे घेवून त्यांनी शिक्षिका म्हणून शाळेत कार्य केले. साहित्य निर्मिती करुन आपल्या कवितेतून समाज प्रबोधन केले असेही त्यांनी म्हटले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ.मांजरे म्हणाले, सावित्रीबाई फुले यांनी अग्निफुले, बावनकशी, सुबोध रत्नाकर असे काव्यसंग्रह लिहिले.महात्मा फुले यांच्या त्या धर्मपत्नी होत्या. सबंध आयुष्यभर त्यांनी ज्योतिरावांच्या कार्याला साथ दिली.ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले हे भारतातील आदर्श दाम्पत्य होते.बहुजन समाजाचे नायक होते असे म्हटले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.सुरेश शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहसंयोजक प्रा.डॉ.डी.बी. मुळे यांनी केले.या कार्यक्रमाला प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने घेण्यात आला.

# धनादेशाचा अनादर : सहा महिन्यांचा कारावास

धाराशिव, - मुलीच्या लग्नासाठी हातउसणे घेतलेली रक्कम परत न करता पैसे बुडविण्याच्या उद्देशाने खोटा धनादेश देऊन फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीस न्यायालयाने सहा महिने सश्रम कारावास व अडीच लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही शिक्षा धाराशिव येथील अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती पी.व्ही.मेढे यांनी सुनावली आहे.

ॲड.महेश निंगुळे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, धाराशिव तालुक्यातील चिखली येथील फिर्यादी काशिनाथ हनुमंत भोजने यांनी केकस्थळवाडी येथील त्यांचे मित्र भगिरथ अंबऋषी कावळे यांना सन २०१५ मध्ये मुलीच्या लग्नासाठी तसेच लोकांचे देणे देण्यासाठी २ लाख रुपयांची रक्कम परत करण्याच्या बोलीवर दिली होती. ही रक्कम जानेवारी २०१६ मध्ये परत करायचे ठरले होते. परंतु, मुदत उलटल्यानंतर सातत्याने पैशाची मागणी करूनही भगिरथ कावळे यांच्याकडून रक्कम देण्यास टाळाटाळ होत गेली. त्यानंतर श्री कावळे यांनी दि.२६ मे २०१६ रोजी फिर्यादी काशिनाथ भोजणे यांना २ लाख रुपये रक्कमेचा बँक ऑफ इंडिया शाखा धाराशिवचा धनादेश दिला.

परंतु, सदरचा धनादेश न वठल्याने फिर्यादीने ॲड. निंगुळे यांच्या मार्फत न्यायालयात दाद मागितली. प्रकरणाच्या सुनावनीत समोर आलेले पुरावे, साक्ष तसेच फिर्यादीचे वतीने ड.निंगुळे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरत अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती मेढे यांनी आरोपीस सहा महिने सश्रम कारावास व फिर्यादीस अडीच लाख रुपये दंडाफोटी देण्याचे आदेश दिले. याप्रकरणी ॲड. निंगुळे यांना ॲड. निखिल शेंडगे यांनी सहकार्य केले.

# राजकुमार नानासाहेब पाटील यांचा वाढदिवस मित्रपरिवारात उत्साहात साजरा



**दै. अदिती एक्सप्रेस**

शिरूर अनंतपाळ प्रतिनिधी -साकोळ येथील ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच तथा जनसामान्यांच्या अडचणींना सदैव मदतीस धावून जाणारे राजकुमार नानासाहेब पाटील यांचा वाढदिवस मित्रपरिवाराच्या वतीने नवीन वर्षाच्या जल्लोषातच १ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

साकोळ येथील सुपुत्र असलेले राजकुमार पाटील यांनी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत समाजातील अनेक गरजू घटकांना वेळोवेळी मदत केली आहे. ते महात्मा बसवेश्वर कॉलेज, लातूरचे सदस्य असून सध्या साकोळ ग्रामपंचायतीचे विद्यमान प्रभारी सरपंच म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा वाढदिवस साजरा करत त्यांना वाढदिवसाच्या व नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी राजकुमार पाटील यांनी उपस्थित मित्रपरिवाराचे आभार मानत, येणारे २०२६ हे वर्ष सर्वांसाठी सुख-समृद्धीचे, भरभराटीचे व आरोग्यदायी जावो, अशा सदिच्छा व्यक्त करत नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या वाढदिवसाच्या शुभप्रसंगी यशवंत पाटील, मेजर शिवराज भुरे, रमेश होनमाळे, सुशील बर्गे, बबन भुरे, मनोज आवाळे, मनोज मोरे, सचिन माळी, आकाश काळू, ओम हंडरगुळे, वैभव पाटील, तेजस पाटील, संजीव येरोळे, बबन पाटोळे, संगमेश्वर होनमाळे, दीपक सूर्यवंशी, परमेश्वर डोंगरे, श्रीनिवास हंकारे, माणिक मेळकुंद, उद्धव करंडे, मनोज नागुरे, सतीश आवाळे यांच्यासह असंख्य मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थित सर्वांनी राजकुमार पाटील यांना वाढदिवस व नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# विश्वासाला तडा जाऊ देणार नाही




परंडा - शहरातील मतदारांनी आपल्यावर मोठा विश्वास दाखवला आहे. त्याला आपण कधीही तडा जाऊ देणार नाही. माजी मंत्री आमदार प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी निवडणुकीत दिलेला शब्द पूर्णत्वास नेणार असल्याचे प्रतिपादन पदग्रहण सोहळ्यात शिवसेनेचे नगराध्यक्ष जाकिर सौदागर यांनी केले. मतदारांनी शहर विकासासाठी दिलेला कौल दिला आहे. आम्ही त्यात कधीच कमी पडणार नाही असेही सौदागर म्हणाले.

शुक्रवारी रोजी सुफी संत हजरत ख्वाजाबद्दल दिन शहीद चिस्ती दर्ग्यावर जाऊन नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांनी दर्शन घेतले. टिपू सुलतान चौकात समर्थकांनी फटाके फोडून गुलाल उधळून मोठा जल्लोष केला. त्यानंतर वाजत गाजत सौदागर यांची मिरवणूक थेट पालिका आवारात आली तेथे सौदागर यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंके, शिवसेना नेते रामचंद्र घोगरे, जेष्ठ मार्गदर्शक मसरत काजी, राजकुमार देशमुख, अनिल देशमुख, जेष्ठ पत्रकार सुशील शुक्ला, हाफीज करपुडे, वाजीद दखनी, दिलीप प्रणभोर, दत्ता रणभोर, संजयकुमार बनसोडे, विशाल देवकर, माऊली गोडगे, राजाभाऊ जाधव, वैभव पवार, मकसुद पल्ला, मनोज कोळगे, गणेश राशनकर, संजय घाडगे, वाहेद सौदागर, कृष्णा ऐतवाडे, महेमुद पठाण, इर्शाद डोंगरे, नगरसेवक सर्फराज कुरेशी, शरीफ तांबोळी, सत्तार पठाण,साबेर सौदागर, तनवीर मुजावर मतीन जिनेरी, बच्चन गायकवाड, रत्नकांत शिंदे यांची उपस्थीती होती.मुख्याधिकारी सुरेखा कांबळे यांनी नगराध्यक्ष यांचे स्वागत करून नगराध्यक्ष पदाचा पदभार दिला.

# स्पंदन प्रि-प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये 'बाल आनंद मेळावा व खरी कमाई' उपक्रम उत्साहात साजरा

दै. अदिती एक्सप्रेस
मुगांव पाटी

निलंगा / प्रतिनिधी- तालुक्यातील मुगाव पाटी येथील स्पंदन प्रि-प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये ०१ जानेवारी रोजी'बाल आनंद मेळावा व खरी कमाई' हा अभिनव व संस्कारक्षम उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून लहान वयातच विद्यार्थ्यांना श्रम, प्रामाणिकपणा आणि स्वतःच्या कष्टातून मिळणाऱ्या कमाईचे महत्त्व समजावून देण्यात आले.

याप्रसंगी उपस्थित दैनिक एकमतचे पत्रकार राजाभाऊ सोनी, शरद पाटील तसेच गितेश माने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. खरी कमाई म्हणजे केवळ पैशांची नव्हे, तर कष्ट, नैतिक मूल्ये आणि आत्मसमाधानाची कमाई आहे, असे विचार त्यांनी आपल्या मनोगतातून मांडले.

या कार्यक्रमाला मराठवाडा २४ तासचे संपादक चंद्रकांत पाटील, गौर गावचे सरपंच




प्रतिनिधी विठ्ठल टोकले, अमोल सावंत, शेषराव भोजने, बाबुराव स्वामी, नामदेव कदम, राम कोळेकर, प्रवीण स्वामी, दिगंबर शिंदे, सूर्यवंशी मनोज, शब्बीर शेख, व्यंकट वाडीकर, अंतेश्वर सूर्यवंशी, संजय चव्हाण, युसुफ शेख, विष्णू पोसे तसेच शाळेचे मुख्याध्यापक गोविंद ठाकूर उपस्थित होते.यांच्यासह या कार्यकाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षिका निटुरे जे. व्ही., निटुरे ए. एस., कावळे, शिंदे आर्दीनी परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांतून सहभाग नोंदवून आनंद घेतला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले.

# लाचखोर तलाठ्याला अटक

## उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी लाचेची मागणी

दै. अदिती एक्सप्रेस

निलंगा प्रतिनिधी : श्रावणबाळ आणि वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेसाठी आवश्यक असलेला उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या गुंजरगा (ता. निलंगा) येथील तलाठ्याला गुरुवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. कमलाकर विठ्ठलराव मुंडे (वय ५२) असे या लाचखोर ग्राम महसूल अधिकाऱ्याचे नाव आहे.

तक्रारदार यांच्या आईच्या नावे शासकीय योजनांचे लाभ घेण्यासाठी उत्पन्नाच्या दाखल्याची गरज होती. हा दाखला देण्यासाठी तलाठी मुंडे यांनी सुरुवातीला ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे ३१ डिसेंबर रोजी तक्रार नोंदवली. गुरुवारी दि. १ जानेवारी २०२६ रोजी निलंगा येथील दत्त नगरमधील खासगी तलाठी कार्यालयात सापळा रचण्यात आला. यावेळी तडजोडी अंती २,५०० रुपये लाच स्वीकारताना मुंडे यांना पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे लाचेची रक्कम आणि मोबाईल संच जप्त करण्यात आला.

### वृद्धांच्या हक्कावरच डल्ला!

ज्या श्रावणबाळ योजनेतून निराधारांना आणि वृद्धांना अत्यल्प मानधन मिळते, त्याच योजनेच्या कागदपत्रांसाठी लाचेची मागणी झाल्याने संताप व्यक्त होत आहे. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी लातूर 'एसीबी'ने ही कारवाई केली. पोलीस उपअधीक्षक संतोष बर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, 'शासकीय कामासाठी कोणी लाच मागत असेल, तर तत्काळ संपर्क साधावा,' असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले.

# असलम डफेदार यांना पीएच.डी. पदवी

अशोक गुरनाळे

बीदर / प्रतिनिधी- भालकी तालुक्यातील मेथीमेळकुंदा येथील शेतकरी कुटुंबातील श्री. इसाकसाब अजमोद्दीन डफेदार यांचे चिरंजीव श्री. असलम इसाकसाब डफेदार यांनी शिवमोग्गा (कर्नाटक) येथील केलडी शिवप्पा नायक कृषी व फलोत्पादन विज्ञान विद्यापीठाअंतर्गत किटकशास्त्र विषयात संशोधन पूर्ण करून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) ही पदवी प्राप्त केली आहे.

सन २०२४२५ या शैक्षणिक वर्षात त्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला असून, विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यास संचालनालयामार्फत त्यांना तात्पुरते पदवी



प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. संशोधन कालावधीत त्यांनी किटकशास्त्र विषयातील विविध महत्त्वपूर्ण घटकांवर सखोल व अभ्यासपूर्ण संशोधन केले. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल मार्गदर्शक प्राध्यापक, सहकारी, मित्रपरिवार तसेच नातेवाइकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शास्त्री विद्यालयात सखी सावित्री समितीची बैठक संपन्न

दै. अदिती एक्सप्रेस
मनेश पाटील

उदगीर :लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात 'सखी सावित्री समिती'ची बैठक संपन्न झाली .

यावेळी बैठकीचे प्रास्ताविक 'सखी सावित्री समिती'च्या प्रमुख अनिता मुळखेडे यांनी केले व मागील बैठकीचे अहवाल वाचन करून ठरवलेल्या व प्रत्यक्ष घेतलेले कार्यक्रमवर चर्चा झाली. उपस्थित सर्व सदस्यांनी आपली मते मांडली.बैठकीसचा



समारोप सखी सावित्री समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे यांनी केला. तर बैठकीचे आभार_ मिनाक्षी कस्तुरे यांनीमानले. बैठकीस प्रशालेचे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर सदस्य: संगीता यतोंडे डॉ सुरेखा गुजलवार,छाया कुलकर्णी, सुरेखा शिंदे,पर्यवेक्षक माधव मठवाले विद्यार्थी प्रतिनिधी चि.आरूषरेड्डी,चि.देवव्रत माने उपस्थित होते.

# पोलिसांशी मैत्री करा:पो. उप. नि. अजय पाटील

दै. अदिती एक्सप्रेस

भूतमुगळी/ प्रतिनिधी- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भूतमुगळी येथे विद्यार्थी सुरक्षा अंतर्गत मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

यावेळी कासार शिरसीचे पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षा विषयी सूचना केल्या. काही मदत हवी असल्यास नि संकोचपणे पोलिसांना कॉल करा. ते तुमचे मित्र, रक्षणकर्ते आहेत असे सांगितले.या शिबिरादरम्यान विद्यार्थी आणि पोलीस



यांच्यामध्ये चांगल्या प्रकारे सुसंवाद घडून आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कासार शिरसीचे पोलीस सुनील पाटील, शाळेचे मुख्याध्यापिका बेळकीरे मॅडम,बोयणे सर, गायकवाड सर, जमादार सर,कार्लेकर मॅडम हे उपस्थित होते. सुनील टोम्पे सरांनी प्रस्तावना केली तर हिरास सरांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.

# सिटी प्रेस क्लब चाकूरचे पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार जाहीर

## जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर,काशीबाई थोरात,अभय मिरजकर आणि नागनाथ पाटील यंदाच्या पुरस्काराचे मानकरी

दै. अदिती एक्सप्रेस

चाकूर : प्रतिनिधी - येथील सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या पत्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा नुकतीच करण्यात आली असून उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार संपादक संजय जेवरीकर,पत्रकार भूषण पुरस्कार काशीबाई थोरात,मायदादा वृतरत्न पुरस्कार अभय मिरजकर आणि चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार नागनाथ पाटील यांना देण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे.

सदरील पुरस्कारांचे वितरण सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य कार्यक्रमात राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात केले जाणार असल्याची माहिती पुरस्कार दिले जात आहेत. गेल्या वर्षी दैनिक एकमतचे संपादक मंगेश डोंग्रजकर, टाईम्स नाऊ मराठीचे जिल्हा प्रतिनिधी जेवरीकर, वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई -काशीबाई थोरात,दैनिक सामनाचे जिल्हा






सिटी प्रेस क्लब चाकूरचे अध्यक्ष प्रा.अ. ना. शिंदे व सचिव मधुकर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने गेल्यावर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या पत्रकारांना शशिकांत घोणसे पाटील, दैनिक मराठवाडा केसरी सह अनेक दैनिकांचे समुह संपादक नरसिंह घोणे व दैनिक गावकरीचे जिल्हा प्रतिनिधी संजीव पाटील यांना देण्यात आले होते.

यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ पत्रकार संजय प्रतिनिधी अभय मिरजकर आणि नागनाथ पाटील आहेत. स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ. ना.शिंदे यांच्यावतीने 'मराठवाडा स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर यांना दिला जाणार आहे.कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर,स्व. काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्वर जनगावे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार' वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई -काशीबाई थोरात यांना तर चाकूर येथील जेष्ठ पत्रकार नागनाथ पाटील यांना 'चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार' दिला जाणार आहे.

# छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या वार्षिक शिबिराचा समारोप संपन्न



पाटील मनेश

उदगीर / प्रतिनिधी- छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबीर मौजे बामणी येथे पार पडले. या शिबिराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कि. शि.प्र. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. माधवराव पाटील हे होते. प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे , डॉ. विष्णू पवार , डॉ.अनंत टेकाळे यांची प्रमुख विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मौजे बामणीचे सरपंच कै. राजकुमार बिराजदार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या प्रसंगी प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे म्हणाले, बामणी गावातील सर्व नागरिकांचे आमच्या शिबिरासाठी खूप मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच आमचे विद्यार्थी आनंदाने उपक्रम राबवू शकले. गावकऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या संस्थेच्या वतीने आभार. यावेळी डॉ.अतिष आकडे यांनी शिबिराचा अहवाल सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विश्वनाथ भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. हरीभाऊ ढगे यांनी केले. याप्रसंगी बामणी येथील ग्रामस्थ व शिबिरार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या विशेष वार्षिक शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व कार्यक्रमाधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी परीश्रम घेतले.

# भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त उदगीरात अभिवादन



दै. अदिती एक्सप्रेस
मनेश पाटील

उदगीर /प्रतिनिधी- ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजय दिनाच्या २०७ व्या शौर्य दिनाचे औचित्य साधून उदगीर येथे अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ कोरेगाव विजय स्तंभाची प्रतिकात्मक स्तंभा तयार करुन अभिवादन करण्यात आले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ दि. १ जानेवारी रोजी पोलीस निरीक्षक गाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित अभिवादन कार्यक्रमास समता सैनिक दलाने विजयस्तंभास मानवंदना दिली. यावेळी विद्यासागर डोरनाळीकर, बाबासाहेब सुर्यवंशी, धनाजी बनसोडे, राहुल गायकवाड, मनोहर गायकवाड, दशरथ वाघमारे, अनुरथ कांबळे, शक्ती बलांडे, शिवकुमार कांबळे, दयानंद कांबळे, शाहुराज किंवडे, अमोल तांबरे, उत्तम पकोळे, राजकुमार गंडारे, सुनील गोडबोले, सुनील पकोळे, कमलाकर सांगविकर, मिलींद कांबळे, गोपाळ कांबळे, बंटी घोरपडे आदींसह शेकडो आंबेडकर प्रेमींनी विजयस्तंभास अभिवादन केले. दरम्यान नवनिर्वाचित नगरसेवक जवाहरलाल कांबळे, धीरज कसबे, वर्षा कांबळे, अमर सुर्यवंशी, मुक्राम जागीरदार आदींचा सत्कार करण्यात आला.

# देवणी पंचायत समितीतील सावित्री बाई फुले जयंती साजरी

## जयंतीला महिला कर्मचाऱ्यांची दांडी ; या प्रकारावर गटविकास अधिकारी कारवाई करणार का?

दै. अदिती एक्सप्रेस

देवणी : सर्व महापुरुषांच्या जयंती शासकीय पातळीवर साजऱ्या करण्याबाबत स्पष्ट परिपत्रक असतानाही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीच्या दिवशी देवणी पंचायत समितीत घडलेला प्रकार चर्चेचा विषय ठरत आहे. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांमुळे आणि संघर्षामुळे आज महिलांना शिक्षण, सन्मान व संधी मिळाल्या असताना, ३ जानेवारी रोजी पंचायत समितीत आयोजित जयंती कार्यक्रमाला एकही महिला कर्मचारी उपस्थित नसणे ही बाब अनेक प्रश्न उपस्थित करत आहे.

देवणी पंचायत समितीत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली; मात्र या कार्यक्रमास उपस्थित राहण्यास सावित्रीच्या लेकी म्हणवून घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी




पूर्णपणे दांडी मारली. त्यामुळे अनुपस्थित महिला कर्मचाऱ्यांवर गटविकास अधिकारी कारवाई करणार का? असा सवाल उपस्थित होत आहे.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व महान समाजसुधारक होत्या. त्यांनी पती महात्मा ज्योतीराव फुले यांच्या सोबत १८४८ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. अंधश्रद्धा, बालविवाह, विधवा अत्याचार यांसारख्या कुप्रथांविरोधात आवाज उठवत विधवा पुनर्विवाह, आंतरजातीय विवाहाला पाठिंबा दिला. समाजाच्या अंधश्रद्धेच्या विळख्यातून महिलांना बाहेर काढण्यासाठी त्यांनी शेण, दगड, गोटे सहन करत शिक्षणाचा प्रकाश दिला. त्यामुळेच आज महिला सर्व क्षेत्रांत मान-सन्मानाने काम करत आहेत.

असे असतानाही देवणी पंचायत समितीत कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना या महान कार्यकर्तीचा विसर पडणे ही बाब खेदजनक असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. तू जरी सावित्रीबाईंना विसरलीस, तरी तिचे उपकार तुझ्यावर कायम राहतील अशी प्रतिक्रिया यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे. देवणी पंचायत समितीत साजऱ्या झालेल्या जयंती कार्यक्रमास विस्तार अधिकारी अल्लापुरे, दिलीप कांबळे, कोठुळे, रणदिवे, मूळेमामा आदी अधिकारी उपस्थित होते. मात्र महिला कर्मचारी पूर्णपणे अनुपस्थित राहिल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व्हावी अशी मागणी होत आहे. या प्रकरणात गटविकास अधिकारी नेमकी कोणती कार्यवाही करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.